वर्ष-०७ अंक-४७ मुंबई, मंगळवार १२ ते १८ ऑक्टोबर २०२१ पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION NO. PLG/205/2019-2021

# पोलीस बातमी पत्र

•संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2 'फोर्स वन' पोहोचण्याआधीच नगर पोलिसांनी केले 'हे' कठीण ऑपरेशन

3 → कोरोना काळात कर्तव्यदक्ष राहून उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल

नगर पोलीस ठाण्याची धडाकेबाज कामगिरी- आरोपीस 48 तासांत केली अटक. ← 4

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page

## सुबोधकुमार जयस्वाल यांना मुंबई पोलिसांचे समन्स



मुंबई : गोपनीयतेचा भंग केल्याप्रकरणी केंद्रीय अन्वेषण विभागाचे संचालक सुबोधकुमार जयस्वाल यांना सायबर पोलिसांनी समन्स बजावला आहे. यापूर्वी या प्रकरणात वरिष्ठ आयपीएस अधिकारी रश्मी शुक्ला यांचा जबाब नोंदवला. १४ ऑक्टोबरला त्यांना चौकशीसाठी उपस्थित राहण्यास सांगण्यात आले आहे. राज्याचे मुख्य सचिव सीताराम कुंटे यांना गोपनीयतेचा भंग केल्याप्रकरणी चौकशी करून अहवाल सादर करण्यात सांगितले होते. त्याप्रकरणी कुंटे यांच्या अहवालानंतर याप्रकरणी मुंबई सायबर ...पान २ वर...

# चिपीचे टेकऑफ : विमानतळाचे मुख्यमंत्री ठाकरेंच्या हस्ते लोकार्पण



बहुद्देशीय चिपी विमानतळाचा लोकार्पण काल मुख्यमंत्र्यांच्या हस्ते पार पडला. या सोहळ्यात शिवसेनेचे कडवे विरोधक असलेले केंद्रीय सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगमंत्री नारायण राणे आणि मुख्यमंत्री उध्दव ठाकरे एकाच व्यासपीठावर आले आणि त्यांनी एकमेकांवर कुरघोडी करत उद्घाटन सोहळ्याचा रंग बदलला. खोटे बोलणारी माणसे बाळासाहेबांना आवडत नव्हती, म्हणून अशा लोकांना त्यांनी पक्षातून काढले, अशा शब्दात मुख्यमंत्र्यांनी राणेंच्या सेना दुराव्याची स्पष्टोक्ती दिली. याच व्यासपीठावर राणेंनी उद्धव ठाकरेंच्या मनोकामना पूर्ण करण्यासाठी गाऱ्हाणे घातले. नागरी उड्डाणमंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी या सोहळ्यात ऑनलाईन सहभाग घेत चक्क मराठीतून भाषण केले आणि चिपीच्या या विमानतळामुळे कोकणला विकासाची संधी चालून आल्याचे म्हटले.
चिपी विमानतळाच्या उद्घाटनाच्या निमित्ताने केंद्रीय सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगमंत्री नारायण राणे आणि राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे १६ वर्षांच्या राजकीय प्रवासानंतर प्रथमच एका व्यासपीठावर आले होते. यावेळी नारायण राणे आणि उद्धव ठाकरे यांच्यातील दुरीचे दर्शन पुन्हा एकदा पाहायला मिळाले. व्यासपीठावरून बोलताना नारायण राणे आणि उद्धव ठाकरे यांनी एकमेकांवर जोरदार हल्ला चढवला.
सोहळ्यात राणे यांचे भाषण झाले. आपल्या भाषणात त्यांनी शिवसेना खासदार विनायक राऊत यांच्यावर जोरदार टीका केली. राऊत यांनी चिपी विमानतळासह जिल्ह्यातील अनेक विकासकामांत अडथळा निर्माण केल्याचा गंभीर आरोप राणेंनी केला. राऊत यांनी सुभाष देसाई यांचा उल्लेख चिपी विमानतळाचे मालक असा केल्याचा ...पान २ वर...

## पुष्पक एक्स्प्रेसमध्ये बलात्कार आणि दरोडा



कल्याण : लखनौहून मुंबईच्या दिशेने येत असलेल्या पुष्पक एक्स्प्रेसमध्ये शुक्रवारी सायंकाळी इगतपुरीजवळील घाटात सामूहिक बलात्कार आणि दरोड्याची भीषण घटना घडली. आठ ते दहा दरोडेखोरांनी एक्स्प्रेसमध्ये शिरून शस्त्रांचा धाक दाखवत प्रवाशांकडील रोख रक्कम आणि मोबाईल लुटले. या लुटमारीदम्यान दरोडेखोरांनी एका महिलेवर तिच्या पतीदेखतच बलात्कार केला. या घटनेनंतर सर्वत्र संताप व्यक्त होत आहे. काही धाडसी प्रवाशांनी पकडलेल्या दोघांसह एकूण चार दरोडेखोरांना कल्याण लोहमार्ग पोलिसांनी अटक केली असून या गुन्ह्यात लुटलेल्या ९६ हजार ३९० रुपयांचा ...पान २ वर...

## परमबीर सिंह यांना गुन्हे शाखेची नोटीस



मुंबई : मुंबईचे माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंह यांना गुन्हे शाखेने नोटीस पाठवून १२ ऑक्टोबरला चौकशीसाठी उपस्थित राहण्यास सांगितले आहे. याबाबतची नोटीस परमबीर सिंह यांच्या मुंबईतील घराबाहेरही चिकटवण्यात आली आहे. गोरेगाव पोलीस ठाण्यात दाखल खंडणी प्रकरणात गुन्हे शाखेने ही नोटीस पाठवली असल्याचे वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले. गोरेगावमधील बिमल अग्रवाल या बिल्डराने ९ लाख रुपयांच्या खंडणीचा आरोप करत हा गुन्हा दाखल केला होता. तसेच सचिन वाझेला आत्तापर्यंत एकूण ११ लाख ९२ हजारांचा हप्ता दिल्याचेही त्यांनी तक्रारीत म्हटले होते. परमबीर सिंह यांच्यासह सचिन वाझे, सुमिर्त सिंह ऊर्फ चिंटू, अल्पेश पटेल, विनय सिंह ऊर्फ बबलू ...पान २ वर...

## डब्बेवाल्यांना मोफत सायकल वाटप



भाईंदर :- मीरा भाईंदर शहरात रविवारी सकाळी ११ च्या सुमारास सेवन इलेवन शाळेत "मेकिंग द डिफरेंस" संस्थे मार्फ़त घरा-घरात जाऊन डब्बे पुरवण्याचे काम करणाऱ्या डब्बे वाल्यांना पन्नास सायकल मोफत वाटन्यात आल्या आहेत.यावेळी कार्यक्रमात कल्पतरु ग्रुप ऑफ कंपनी व जेएमसी प्रोजेक्ट,ललित तिवारी,कृष्णा ...पान २ वर...

## अमली पदार्थांच्या व्यापारात करोनाकाळात वाढ



मुंबई : अमली पदार्थांची खरेदी-विक्री करणारी टोळी करोनामुळे लागलेल्या टाळेबंदीच्या काळात अधिक सक्रिय झाल्याचे पोलिसांनी या काळात केलेल्या कारवाईवरून दिसून येत आहे. या वर्षांत तर आधीच्या वर्षाच्या तुलनेत अमली पदार्थांचा तिपटीहून अधिक साठा पोलिसांनी ताब्यात घेतला आहे. मुंबई पोलिसांच्या अमली पदार्थविरोधी कक्षाने २०१९ मध्ये केलेल्या कारवाईत वर्षभरात ५१४ गुन्हे दाखल करण्यात आले. ...पान २ वर...

## न्हावाशेवात जप्त केलेले हेरॉईनही अफगाणिस्तानमधील



मुंबई : महसूल गुप्तचर संचालनालयाने (डीआरआय) नवी मुंबईतील न्हावा शेवा बंदरातून १२५ कोटी रुपेय किमतीचे सुमारे २५ किलो हेरॉईन जप्त केले होते, ते अफगाणिस्तानच्या कंधार येथून पाठवण्यात आल्याचे निष्पन्न झाले आहे. हा सर्व व्यवहार हवाला मार्फत करण्यात आला होता. याप्रकरणी डीआरआयने हवालासह आर्थिक व्यवहारात सहभागी असलेल्या आणखी दोन व्यक्तींना अटक केली आहे. यापूर्वी डीआरआयने या प्रकरणी एका व्यावसायिकाला अटक केली होती.
डीआरआयने बुधवारी न्हावा शेवा बंदरातील एका कंटेनरमधून २५ किलो हेरॉईन जप्त केले आहे. शेंगदाण्याचे तेल असल्याचे भासवून कंटेनरमधील खोक्यात हे अमली पदार्थ दडविण्यात आले होते. इराणवरून आलेला हा माल मशीद बंदर येथील संदीप ठक्कर या व्यावसायिकाच्या आयात क्रमांकावरून भारतात आणण्यात ...पान ४ वर...

## अज्ञात मृतदेहाचे रहस्य उलगडले; सिंहगड पोलिसांनी ४८ तासांत लावला छडा



पुणेः धायरी येथे अज्ञात इसमाचा मृतदेह आढळल्याने एकच खळबळ माजली होती. या मृतदेहाचे गुढ सिंहगड पोलिसांनी ४८ तासात उकलले आहे. गुरुवारी रात्री धायरी येथे मोकळ्या पडीक जागेत एका अज्ञात इसमाचा मृतदेह सापडला होता. बेवारस मृतदेह अज्ञात असल्याने त्याची ओळख अद्याप पटवणे पोलिसांसमोर मोठे आव्हान होते. मात्र, ४८ तासांतच पोलिसांनी या खुनाचा छडा लावला आहे. गुरुवारी पोकळेनगर धायरी येथे एक अज्ञात मृतदेह सापडल्याची माहिती नागरिकांनी पोलिसांना कळवली होती. त्यानुसार पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली होती. त्या व्यक्तीचा डोक्यात दगड घालून खून करण्यात आल्याचा प्राथमिक अंदाज होता. मृतदेहाचा चेहरादेखील विद्रुप करण्यात आला होता त्यामुळं मृतदेहाची ओळख पटविणे हे पोलिसांसमोर मोठे आव्हान होते. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता पोलिसांनी लगेचच तपासाची चक्रे फिरवली. तपास पथक धायरी परिसरात शोध घेत असताना मयत इसमाबाबत माहीती मिळाली की, सदरच्या मयत इसमाचे नाव मंगल प्रसादसिंग गुप्ता असे असून तो फिरस्ता आहे. तो सुमारे २५ वर्षापासुन धायरी परिसरात राहण्यास असून तो मिळेल तेथे काम करून संध्याकाळी दारु पिऊन मिळेल त्या ठिकाणी झोपत असतो. मयत इसमाची ओळख पटल्यानंतर पोलीसासमोर घटनास्थळावर कोणत्याही प्रकारचे सी.सी.टि.व्ही फुटेज अथवा कोणाताही धागादोरा नसताना आरोपीचा माग काढणे हे आव्हान होते. वरिष्ठांनी दिलेल्या सुचना प्रमाणे ...पान २ वर...

## प्रादेशिक सेनेने 72 वा स्थापना दिवस 9 ऑक्टोबर 2021 रोजी साजरा केला





हा दिवस आपल्या सर्वापताठी भारतीय लष्कराच्या या उत्कृष्ट संघटनेच्या यशाचा अभिमान वाटेल असा आहे. प्रादेशिक सेनेची स्थापना 09 ऑक्टोबर 1949 ला प्रथम भारतीय गवर्नर जनरलश्री सी राजगोपालाचारी यांच्या द्वारे केली ...पान २ वर...

## गुन्हेगारांची सुरस कथा: पठ्ठे ऐटबाज रहायचे, चारचाकीतून यायचे अन् मंगळसूत्र चोरायचे; गुजरातची टोळी नाशिकमध्ये चतुर्भुज




नाशिकः त्यांनी आजीबाईचं डोरलं चोरलं आणि तिथंच गावले. आता त्यांची सुरस कथा समोर आली. हे पठ्ठे म्हणे ...पान २ वर...

## लातूरात सव्वाकोटींचा गुटखा जप्त, सलग दोन दिवस धाडसत्र, गुटखा किंगचे धाबे दणाणले



लातूर: लातूरमधील गंजगोलाई परिसरातील एका दुकानावर टाकलेल्या छाप्यात सव्वा कोटी रुपयांचा गुटखा आणि सुगंधित तंबाखूचा साठा जप्त (Latur crime) करण्यात आला आहे. गेल्या अनेक दिवसांपासून लातूर शहरासह जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांच्या हद्दीत चोरट्या मार्गाने गुटखा विक्री आणि साठा सुरु आहे. यातील गुटखा किंगला लातूरच्या जिल्हा पोलीस अधीक्षकांनी चांगलाच दणका दिला आहे. या धाडीत मोठ्या प्रमाणावर गुटखा आणि तंबाखू जप्त करण्यात आली. शनिवार व रविवारी मोठे धाडसत्र सहाय्यक पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या पथकाकडून लातूर शहरातील अवैध धंद्यांवर कारवाई करण्यात येत आहे. गंजगोलाईतील एका दुकानात गुटखा आणि सुगंधित तंबाखूची विक्री होत असल्याची माहिती त्यांना मिळाली होती. त्यानुसार, त्यांनी प्रेम एजन्सी या दुकानावर छापा टाकला. तसेच शहरातील विविध गोदामांचीही तपासणी केली. यात सव्वा कोटी रुपयांचा गुटखा आणि सुगंधित तंबाखूचा साठा सापडला. अनेक गोदामांवर धाडी गंजगोलाईतील ...पान २ वर...

# 'फोर्स वन' पोहोचण्याआधीच नगर पोलिसांनी केले 'हे' कठीण ऑपरेशन




अहमदनगर: घरात शस्त्रासह शिरलेल्या आरोपीने घरातील मुलीच्या डोक्यावर शस्त्र रोखून तिला ओलीस ठेवले होते. आपल्याविरुद्ध दाखल केलेला गुन्हा मागे घ्या, अशी त्याची मागणी होती. मुख्य आरोपी बडतर्फ पोलिस अधिकारी असल्याने त्याला पोलिसांची कार्यपद्धती पुरेपूर माहिती होती. त्याच्या तावडीतून घरात अडकलेल्या कुटुंबाची सुरक्षित सुटका करणे आणि त्याला जेरबंद करणे हे मोठे आव्हान पोलिसांसमोर होते. दहशतवादी वापरतात, तशीच पद्धत त्याने अवलंबली होती. त्यामुळे वरिष्ठ पातळीपर्यंत सूत्रे हलली. अशी ऑपरेशन फत्ते करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या 'फोर्स वन' ला पाचारण करण्यात आले. मात्र, तोपर्यंत पोलिस उपअधीक्षक संदीप मिटके आणि पोलिस निरीक्षक राजेंद्र इंगळे यांनी स्वत:चा जीव धोक्यात घालून ऑपरेशन फत्ते केले. राहुरी तालुक्यातील डिग्रज गावात गुरुवारी राबविण्यात आलेले हे कठीण ऑपरेशन नेमके कसे पार पडले, याचा तपशील आता समोर आला आहे. नाशिक विभागाचे पोलिस उपमहानिरीक्षक डॉ. बी. जी. शेखर पाटील यांच्या हस्ते ही कामगिरी फत्ते करणाऱ्या पोलिस पथकाला बक्षिसे देण्यात आली.


## मिरा भाईंदर महानगरपालिका

उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग

तळ मजला, प्रभाग समिती क्र.4, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व), ता.जि.ठाणे-४०१ १०७. दुरध्वनी क्र. २८१०३४०९

जा.क्र. मनपा/वृ.प्रा./मिरारोड/ ४८४ /२०२१-२२ दिनांक : ०६/१०/२०२१

// जाहीर नोटिस सुचना //

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन अधिनियमाच्या प्रकरण पाच कलम ८ (३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहिर करण्यात येते की, खालील नमुद तक्त्यातील झाड काढणे / पुर्न:रोपण करणेकामी प्रत्यक्ष पाहणी केली असता त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | सर्वे क्र. | वृक्षाचे नाव | उंची | संख्या | तपशिल |
|---|---|---|---|---|---|
| १. | मौजे वरसावे सर्वे क्र. २० | नारळ | ३५ ते ४० फुट उंच | ०२ | सदरची झाडे मौजे वरसावे सर्वे क्र. २० व सर्वे क्र. ३४ मध्ये सुर्या प्रादेशिक पाणी पुरवठा प्रकल्पाच्या जलवाहीनी टाकण्याच्याकामात बाधित होत असल्याने मुळासहित काढणे आवश्यक आहे. **(मा. कार्यकारी अभियंता, एम. एम. आर. डी. ए. यांचे दि.२६/०८/२०२१ रोजीचे पत्र)** |
| २. | | नारळ | ४० ते ४५ फुट उंच | ०१ | |
| ३. | | गुलमोहर | ४० ते ४५ फुट उंच | ०२ | |
| ४. | | आंबा | १० ते १२ फुट उंच | ०१ | |
| ५. | मौजे वरसावे सर्वे क्र. ३४ | जंगली | १० ते २० फुट उंच | ०२ | |
| ६. | | ताड | ४० ते ४५ फुट उंच | ०१ | |
| ७. | | आंबा | ३५ ते ४० फुट उंच | ०१ | |
| ८. | | जांभुळ | ३५ ते ४० फुट उंच | ०१ | |
| ९. | | जंगली | १० ते १२ फुट उंच | ०१ | |
| १०. | | जंगली | २० ते २२ फुट उंच | ०३ | |
| ११. | | अशोक | ३० ते ३५ फुट उंच | ०१ | |
| १२. | | कपाशी | ३० ते ३५ फुट उंच | ०१ | |
| १३. | | आंबा | २२ ते २५ फुट उंच | ०१ | |
| | | | एकुण | १८ | |

सदर प्रस्तावित वृक्ष तोडण्याची /स्थलातंरीत करण्याची परवानगी देण्याचा इरादा आहे. याबाबत नागरिंकाच्या काही हरकती तसेच सदर वृक्षांवर पक्षांचो घरटी असल्यास जाहिर सुचना प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत लेखी स्वरुपात उप-आयुक्त (वृक्ष प्राधिकरण), उद्यान व वृक्षप्राधिकरण विभाग, मुख्य कार्यालय, भाईंदर (प.) येथे किंवा garden@mbmc.gov.in किंवा mbmc.garden@gmail.com या ई-मेल आयडी वर कळविण्यात यावे. तसेच मुदतीनंतर प्राप्त होणा-या हरकती/सुचनांचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/ -**
**कंचन गायकवाड़**
**सहाय्यक आयुक्त तथा**
**वृक्ष अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**जा.क्र मनपा/जनसंपर्क/ ३०८/ २०२१-२२**
**दिनांक ०६/१०/२०२१**


### विपीचे टेकऑफ : विमानतळाचे

आहे, अशा शब्दांत उद्धव ठाकरे यांनी नारायण राणेंवर पलटवार केलाय. 'आपण केंद्रात मंत्री आहात. लघू का असेना सुक्ष्म का असेना पण खाते मोठे आहे. त्याचा उपयोग महाराष्ट्राला नक्की करून द्याल, ही तुमच्याकडून मला अपेक्षा आहे. मी कुठेही पक्षभेद आणत नाही. तुमच्या कॉलेजच्या बाबतीत जेव्हा फोन केलात, तेव्हा दुसऱ्याच क्षणी मी सही केली. विकासाच्या कामात मी कोतेपणा आणू इच्छित नाही; पण पेढ्यातला गोडेपणा अंगी बाळगावा लागतो. म्हणून 'तिळगूळ घ्या गोड बोला' असे म्हणतात. मला बोलायचे नाही. बोलावे लागत आहे. आजचा कार्यक्रम कोकणसाठी महत्त्वाचा आहे. सगळे मिळून काम करू, असेही मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. सिंधिया महाराष्ट्राच्या अनेक विमानतळांबद्दल भरभरून बोलले. तुमचे अभिनंदन करतो. इतक्या लांब राहूनही मराठी मातीचा संस्कार आपण जपलात. मला वाटत होते की मी केंद्रीय मंत्री आहे आणि तुम्ही मुख्यमंत्री आहात.

### अज्ञात मृतदेहाचे रहस्य पृष्ठ १ वरुन

तपास पथकाची टिम धायरी परिसरात गुन्ह्याचा तपास करीत असताना तपास पथकातील पोलीस अंमलदार सुहास मोरे यांना त्यांच्या गुप्त बातमीदारामार्फत माहीती मिळाली. रात्रीच्या वेळी एक अनोळखी इसम घटनास्थळाच्या आजुबाजुला घुटमळत होता व तो घाबरलेला दिसत होता. या माहीतीच्या आधारे व सदर इसमाच्या मिळालेल्या वर्णनाच्या अनुषंगाने तपास पथकाची दोन पथके तयार करून सदर इसमाचा शोध सुरू केला असता. त्या वर्णनाचा इसम हा अंबाईदरा येथील एका हॉटेलमध्ये काम करत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार धायरी परिसरातील हॉटेलमध्ये माहीती घेत असताना एका हॉटेल मालकाची चौकशी केल्यावर मिळालेल्या माहितीनुसार एक कामगार दोन दिवसापासुन कामावर आला नव्हता. त्यावरून पोलीसाचा संशय बळावला व सदर हॉटेल कामगारास ताब्यात घेवून त्याच्याकडून गुन्हा कबुल करुन घेतला. दरम्यान, आरोपीचे नाव शुभम भगवान पुयड वय-२५ वर्षे आहे. मयत व आरोपीत शाब्दिक चकमक झाल्यावर रागाच्या भरात त्यांने सदर इसमाच्या डोक्यात दगड घालून खून केल्याचे त्याने सांगितले आहे.आरोपीस ०६ दिवसांची पोलीस कोठडी मिळाली आहे.

### न्हावाशेवात जप्त केलेले पृष्ठ १ वरुन

आला. नवी मुंबईतील जयेश संघवी याला ठक्कर याने त्याचा आयात क्रमांक दिला होता. या मालासाठी त्याला १० हजार रुपये देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. ठक्कर हा संघवीसोबत गेल्या १० वर्षांपासून व्यवहार करत आहे. त्यामुळे त्याच्यावर विश्वास असल्यामुळे आपण आयात क्रमांक दिल्याचे ठक्कर याने चौकशीत सांगितले. त्या कंटेनरमध्ये अमली पदार्थ असल्याची माहिती नव्हती असेही ठक्कर याने डीआरआयला सांगितले. ठक्करने दिलेल्या माहितीच्या आधारावर डीआरआयने नवी मुंबईतून संघवीला अटक केली असून त्याच्याविरोधात अमली पदार्थ प्रतिबंधक कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### लातूरात सव्वाकोटींचा गुटखा जप्त, पृष्ठ १ वरुन

प्रेम एजन्सीच्या नावे असलेल्या एका दुकानावर आणि त्याने भाडे तत्त्वावर घेतलेल्या विविध गोदामांवर पोलिसांनी धाडी टाकल्या. ही कारवाई सलग दोन दिवस चालली. यात हाती लागलेल्या गुटख्याची मोजदाद केल्यानंतर तो तब्बल 1 कोटी 25 लाख रुपयांचा असल्याचे समोर आले. गुटखा किंगचा आरोपींचा शोध सुरू प्रेम एजन्सीचा मालक प्रेमनाथ तुकाराम मोरे व त्याचा सहकारी शिवाजी मोहिते सावकार याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. या प्रकरणातील आरोपी फरार असून पोलीस त्यांचा शोध घेत आहेत. या घटनेने लातुरमधील गुटखा किंगचे धाबे चांगलेच दणाणले आहेत. आतापर्यंतच्या कारवाईत ही सर्वात मोठी कारवाई ठरली आहे. कर्नाटकमधून आला गुटखामहाराष्ट्र कर्नाटक राज्याच्या सीमेवरील लातूर जिल्ह्यात कर्नाटकातून मोठ्या प्रमाणावर अवैध गुटख्याची वाहतूक होत असल्याचे उघडकीस आले आहे. राज्याची सीमा भेदून हा गुटखा निलंगा, उदगीर, अहमदपूर लातूर जुल्ह्यात विक्रीसाठी आणला जातो. हा गुटखा काही दुकानदारांना वितरीत केला जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली आहे.

### गुन्हेगारांची सुरस कथा: पट्टे ऐटबाज पृष्ठ १ वरुन

ऐटबाज रहायचे. चारचाकी वाहनातून यायचे आणि मंगळसूत्र चोरी करायचे. या टोळीला पंचवटी पोलिसांनी अखेर बेड्या ठोकल्या आहेत. याबाबत सविस्तर माहिती अशी की, रविवारी सकाळी (10 ऑक्टोबर) पावणे अकराच्या सुमारास सुमन नारायण सोमवंशी (वय 65) या नातवाला शिंदेनगरातील मखमलाबाद रोडवरील एका कोचिंग क्लासेसमध्ये सोडून आल्या होत्या. तेव्हा त्या कोचिंग क्लासेसच्या बिल्डिंग बाहेर एक निळया रंगाची चारचाकी उभी होती. त्या चारचाकीमधून एक उंचापुरा आणि पांढराशुभ्र शर्ट घातलेला माणूस बाहेर पडला. त्याने काही कळायच्या आत सुमन शिंदे यांच्या गळयातील साडेतीन तोळयांचे सोन्याचे मंगळसूत्र ओढले. त्यांनी प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला. मात्र, चोरट्यांसमोर त्यांची शक्ती कमी पडली. चोरट्याने गंठण हिसकावून चारचाकी गाठली. त्यातून तो आपल्या टोळीसह पसार झाला. याप्रकरणी सोमवंशी यांनी पंचवटी पोलीस ठाण्यात तक्रार दिली. तेव्हा गस्तीवरील पोलीस उपनिरीक्षक राम घोरपडे यांनी ही माहिती पोलीस उपायुक्त अमोल तांबे, सहाय्यक पोलिस आयुक्त मधुकर गावित, वरिष्ठ पोलीस निरीक्षक डॉ. सीताराम कोल्हे यांना दिली. वरिष्ठांच्या मार्गदर्शनानुसार पोलीस निरीक्षक अशोक साखरे यांच्या पथकाने घटनास्थळ गाठले. तिथल्या चौथ्या मजल्यावरील सीसीटीव्हीत चोरटे कैद झाले होते. त्यात त्यांची चारचाकी मेनरोडवरून जाताना दिसली. ही माहिती कर्तव्यावर असलेल्या पोलिसांना देत नाकाबंदी करण्यात आली आणि चोरट्यांचा पाठलाग सुरू झाला. हे संशयित वाहन विठ्ठल रुक्मिणी मंगळ कार्यालयाजवळच्या मारुती मंदिरासमोर पोलिसांनी अडवले. आरोपी पळून जाण्याच्या तयारीत होते. मात्र, पोलीस निरीक्षक अशोक साखरे यांनी दुचाकीवरून तोपर्यंत विठ्ठल रुक्मिणी मंगल कार्यालय गाठले आणि चौघांना बेड्या ठोकल्या. ही धडाकेबाज कारवाई पोलीस आयुक्त दीपक पांडेय, पोलीस उपआयुक्त अमोल तांबे, सहाय्यक पोलीस आयुक्त मधुकर गावित यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक डॉ. सीताराम कोल्हे, पोलीस निरीक्षक अशोक साखरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक सत्यवान पवार, पोलीस उपनिरीक्षक राम घोरपडे, पोलीस हेडकॉन्स्टेबल अंबादास जाधव, पोलीस शिपाई विलास जारवाल यांनी केली. इतर गुन्ह्यांचा तपास सुरू जयसिंग हरीराम यादव (वय 25), पंकज परशुराम यादव (वय 20), कुलदीप भगवानदीप यादव (वय 20) आणि संदीप उमाशंकर यादव (वय 28) अशी आरोपींची नावे असून, ते सर्वजण गुजरातमधल्या सिल्व्हासा (जि. बलसाड) येथील आहेत. त्यांच्याकडून एक लाख रुपये किमतीचे मंगळसूत्र पोलिसांनी हस्तगत केले. त्यांनी चारचाकी वाहनासाठी बनावट नंबर प्लेट वापरल्याचे उघड झाले आहे. चोरट्यांनी अशा प्रकारे इतर गुन्हे केले आहेत का, याचा तपास पोलिसांनी सुरू केला आहे.

### अमली पदार्थांच्या व्यापारात

यात ७१६ किलोंचे अमली पदार्थ जप्त करण्यात आले. तर ५९५ आरोपींना अटक करण्यात आली. टाळेबंदीच्या वर्षात (२०२०) ४१४ गुन्ह्यांमध्ये १,०२३ किलो साठा पोलिसांनी ताब्यात घेतला. तर २०२१ मध्ये यात तिपटीहून अधिक वाढ झाली. चालू वर्षात अवघ्या दहा महिन्यात ४४३ कारवाईत ३,८३५ किलोंचा अमली पदार्थांचा साठा पोलिसांनी जप्त केला आहे. या तिन्ही वर्षात सुमारे ५०० व्यक्तींना पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. जिल्हा स्तरावर अमली पदार्थविरोधी कक्ष शहरांबरोबरच ग्रामीण भागातील तरुणही या व्यसनांच्या आहारी जात आहेत. राज्यातील अमली पदार्थांचे वाढते व्यवहार रोखण्याकरिता गृह विभागाने प्रत्येक जिल्ह्यात पोलीस अधीक्षक यांचे अमली पदार्थविरोधी कक्ष निर्माण करण्याचे ठरविले आहे. गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील यांनी नुकतेच असे निर्देश दिले.

## पृष्ठ १ वरुन

### चिपीचे टेकऑफ : विमानतळाचे

उल्लेख करत 'यामुळे मला कळले विमानतळाचे मालक कोण? उद्धवजी, कोकणचा विकास हे जे काही आहे ते मी साहेबांच्या प्रेरणेतून आत्मसात केले. त्यात माझा स्वार्थ नव्हता. मी छोटा-मोठा उद्योजकही आहे. सिंधुदुर्गाचा विकास कोणत्या माध्यमातून करता येईल याचा विचार मी केला. तेव्हा विमानतळाचा मुद्दा समोर आला. तेव्हा मी टाटांकडे गेलो. बाजूला गोवा आहे, तुम्हाला समुद्र लाभलाय. पर्यटनाच्या दृष्टीने पोषक जिल्हा आहे. आदित्य ठाकरे पर्यटन मंत्री आहेत. त्यांनी टाटांच्या अहवालाचा अभ्यास करावा. विकासासाठी पैसा द्यावा. धरणाला एक रुपया दिला जात नाही. धरणाचं काम अजून पूर्ण नाही. 95 ला युतीची सत्ता आली. मनोहर जोशींना मी सांगितलं की पर्यटन जिल्हा करू. तेव्हा केंद्राकडे परवानगी मागितली आणि देशातील पहिला पर्यटन जिल्हा सिंधुदुर्ग झाला. साहेबांच्या आशीर्वादाने मी मुख्यमंत्री झालो. त्यावेळी गोपीनाथ मुंडे माझे सहकारी होते. जिल्ह्यातील पुलांच्या कामासाठी 120 कोटी, पाण्यासाठी 118 कोटी दिले. आज जे इन्फ्रास्ट्रक्चर दिसते आहे त्याच्या उभारणीला राणेंचे योगदान आहे. दुसरा कुणी इथे येऊच शकत नाही, असे राणे म्हणाले. राणे यांच्या टीकेला मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांनी जशास तसे उत्तर दिले. ते म्हणाले; नारायणराव आपण म्हणता ते खरे आहे. तुम्ही जी विकासकामे केली त्यात तुमचं योगदान नक्की आहे. त्याबद्दल तुमचे धन्यवाद नक्की देतो. पण कोकणची जनता डोळे मिटून कधीच राहत नाही. ती शांत आहे, संयमी आहे. म्हणून सदासर्वदा भयभीत होऊन ती काही करेल असे अजिबात नाही, ती मर्द आहे. म्हणूनच त्या जनतेने तिच्या हक्काचा लोकप्रतिनिधी अनेक वर्षांपासून निवडून दिला आहे. म्हणून खासदार विनायक राऊत यांचा मला अभिमान आहे. हे ही खरे आहे की, बाळासाहेबांना खोटे बोलणारे लोक आवडत नव्हते. म्हणूनच असे खोटे बोलणाऱ्यांना त्यांनी शिवसेनेतून काढून टाकले, हा इतिहास

### पुष्पक एक्स्प्रेसमध्ये

ऐवज जप्त केला. गुन्हा करून दरोडेखोर डब्यातून पळून जात होते. तेव्हा दरोडेखोरांकडे शस्त्र असतानाही काही प्रवाशांनी धाडस दाखवत दोन दरोडेखोरांना पकडले. या दोघांना प्रवाशांनी पोलिसांच्या ताब्यात दिले. या दोघांना कल्याण लोहमार्ग पोलिसांनी अटक केली. त्यांच्याकडून माहिती घेऊन आणखी दोघांना पकडण्यात आले. हे चौघेही १९ ते २१ वयोगटातील असून त्यातील तिघे नाशिकमधील इगतपुरी, घोटी भागातील तर, एकजण मुंबईतील मालाड भागातील रहिवाशी आहे. त्यांचे उर्वरीत साथीदारही इगतपुरी, घोटी परिसरातील असल्याचे तपासात समोर आले. फरार दरोडेखोरांचा शोध घेण्यासाठी लोहमार्ग आणि गुन्हे अन्वेषण विभागाची विशेष पथके स्थापन करण्यात आली आहेत. कसारा आणि कल्याण येथे सर्वच प्रवाशांना प्राथमिक उपचार देण्यात आले आहेत. पिडीत महिलेची वैद्यकीय तपासणी करण्यात आली असून तिची प्रकृती व्यवस्थित आहे, अशी माहीती लोहमार्ग पोलिसांनी दिली. चौघे ताब्यात.. कल्याण रेल्वे स्थानक येताच सज्ज असलेल्या लोहमार्ग पोलिसांनी दोन लुटारुंना ताब्यात घेतले. प्रकाश पारधी, अर्षद शेख अशी त्यांची नावे आहेत. अंमली पदार्थांचे व्यसन या लुटारुंना असावे. त्यामुळे पैशासाठी त्यांनी हा प्रकार केला असावा, असा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. या दोघांकडे चौकशी करून पोलिसांनी त्यांच्या आणखी दोन साथीदारांना अटक करण्यात आली. घडले काय? 'पुष्पक एक्स्प्रेस शुक्रवारी सायंकाळी सहा वाजता इगतपुरी स्थानकात आली. तेथे प्रवासी म्हणून चढलेल्या आठ ते दहा दरोडेखोरांनी चाकू आणि धारदार शस्त्रांचा धाक दाखवून प्रवाशांना मारहाण केली. 'या दरोडेखोरांनी शस्त्रांचा धाक दाखवत प्रवाशांकडील रोख रक्कम आणि मोबाईल लुटले. 'नऊ मोबाईल, सहा प्रवाशांकडील रोख रक्कम असा एकूण ९६ हजार ३९० रुपयांचा ऐवज त्यांनी लुटला.

'याच डब्यात एक महिला तिच्या पतीसह प्रवास करीत होती. तिच्यावर या दरोडेखोरांनी बलात्कार केला.

### प्रादेशिक सेनेने 72 वा स्थापना दिवस

गेली. नागरी सैन्य असण्याच्या उद्देशाने याची स्थापना करण्यात आली, ज्यात आधीच विविध व्यवसायांमध्ये असलेल्या भूमिपुत्रांना गणवेशात राष्ट्राची सेवा करण्याची संधी मिळाली. आजही, 18-42 वर्षांच्या दरम्यान कोणीही भारतीय नागरीक, Jointerritorialarmy.gov.in वेबसाइटवर जी अधिसूचना आहे त्यादवारे प्रादेशिक सेने मध्ये भरती होऊ शकतो. मागिल 72 वर्षापासून, प्रादेशिक सेनेने अनुष्काय व्यावसायिकता आणि बहादुरी दाखवली आहे. तसेच इतर सर्व शांति काळात देशाच्या सेवेत व नैसर्गिक आपदा मध्ये महत्वपूर्ण भूमिका निभावत आहे. प्रादेशिक सेना समूह मुख्यालय दक्षिणी कमानच्या तत्वावधान मध्ये १०१ इन्फेंट्री बटालियन प्रादेशिक सेना मराठा लाइट इन्फँट्री (पुणे टेरियर्स) ने ७२ वा प्रादेशिक सेना दिवस साजरा केला. ' सावधानी व शूरता ' हा आदर्श मानून, रक्तदान शिविर चे आयोजन केले गेले. यामध्ये १०१ जवान व त्यांच्या परिवाराने मिळून रक्तदान केले. ब्रिगेडियर एमएस सिदधू, कमांडर प्रादेशिक सेना समूह मुख्यालय दक्षिण कमान यांनी कार्यक्रमाची शोभा वाढवली. पर्यावरणाचे महत्व लक्षात घेता, छावनी क्षेत्रामध्ये वृक्षारोपण अभियान राबविण्यात आले. या प्रसंगी आपल्या सर्वोच्च बलिदानाची आहुती देणाऱ्या सर्व प्रादेशिक सेनेच्या जवानांना श्रट्धांजलि अर्पित केली गेली. त्यांच्या सर्वोच्च बलिदानामुळे आपण सर्वांना राष्ट्र उभारणीच्या मार्गावर पुढे जाण्यास प्रेरित केले पाहिजे.

### सुबोधकुमार जयस्वाल यांना मुंबई पोलिसांचे समन्स

पोलिसात २६ मार्चला गुन्हा दाखल करण्यात आला होता.याप्रकरणी सायबर पोलीस सध्या तपास करत आहेत. त्याप्रकरणी आता सायबर पोलिसांनी सीबीआयचे संचालक जयस्वाल यांना समन्स बजावून चौकशीला उपस्थित राहण्यास सांगितले होते. जयस्वाल राज्याचे पोलीस महासंचालक होते. त्या वेळी फोन टॅपिंग प्रकरण, तसेच गोपनीय माहिती गहाळ झाल्याचे प्रकरण झाले होते. त्याबाबत माहिती घेण्यासाठी हे समन्स बजावण्यात आले आहे. नुकतीच माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्याविरोधात दाखल गुन्ह्यांप्रकरणी सीबीआयने राज्याचे मुख्य सचिव सीताराम कुंटे व राज्याचे पोलीस महासंचालक संजय पांडे यांना समन्स बजावले होते. त्यामुळे आता दोन यंत्रणांमध्ये वाद पुन्हा चव्हाट्यावर आला आहे.

### डब्बेवाल्यांना मोफत सायकल वाटप

चंद्रा सिंघ, हर्षा उपस्तिथ होते.कोरोनाच्या काळात आधीच डब्बे वाल्यांच्या धंद्यात कमतरता आली होती व रेल्वे बंद असल्याने काही वेळा डब्बा देण्या करता जाण्यास अधिक पैसे ख़र्च करून जावे लागत होते मात्र "मेकिंग द डिफरेंस च्या दीपक यांनी मोफत सायकल वाटप केल्यामुळे डब्बा वेळेत लोकां पर्यंत पोहचवन्यास मदत होणार आहे.यामुळे उपस्तित सर्व डब्बेवाल्यानी संस्थेचे आभार मानले आहेत.कोविड -19 च्या दरम्यान लॉकडाउन दरम्यान लोक घरात बसून होते तेव्हा "मेकिंग द डिफरेंस" लोकांच्या मदति करता सर्वात पुढे होते.दीपक विश्वकर्मा व त्यांची टीम गरजू कुटुंबाना जेवण,औषध पुरवन्याचे काम करत होते.मेकिंग द डिफरेंस या संस्थेने 1.75 लाख राशन किटवाटले आहेत. मुंबई मध्ये जवळपास ५ हजार डब्बे वाले,मूर्तिकार,चर्मकार,ट्रांसजेंडर,प्रवासी मजदुर यांना मदत केली आहे

### परमबीर सिंह यांना गुन्हे शाखेची नोटीस

आणि रियाज भाटी यांच्याविरोधात हा गुन्हा दाखल करण्यात आला होता. हे प्रकरण गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आले असून त्याप्रकरणात १२ ऑक्टोबरला चौकशीसाठी उपस्थित राहण्याची सिंह यांना नोटीस बजावण्यात आली आहे. तक्रारीनुसार, जानेवारी २०२० ते मार्च २०२१ पर्यंत ९ लाख वसुलीचा आरोप तक्रारदाराने केला आहे. बोहो बार अँड रेस्टॉरंटमधून वाझे वसुली करत होते. आत्तापर्यंत वाझेंना ११ लाख ९२ हजारांचा हप्ता दिला आहे, असे बिमल अग्रवाल यांनी आपल्या तक्रारीत सांगितले आहे.

## संपादकीय...



# ड्रग्ज, सेक्स आणि मौजमस्तीच्या अंधाऱ्या रात्री

कॉर्डेलिया क्रूझमधल्या रेव्ह पार्टीवर नार्कोटिक्स कंट्रोल ब्यूरोने छापा टाकून अभिनेता शाहरुख खानचा मुलगा आर्यन याला अटक केली, ही बातमी गेले काही दिवस चर्चेचा विषय झाली आहे. ((mumbai rave party) हे स्वाभाविक असले तरी वास्तवातील कहाणी केवळ एक रेव्ह पार्टी किंवा काही बड्या बापांच्या बेट्यांना अटक झाली ही नाही. अमली पदार्थ , सेक्स आणि मौजमस्तीच्या अंधाऱ्या रात्रींचा व्यापक संदर्भ असलेली ही कहाणी आहे. हे पश्चिमेकडून आले. या नशेत तरुणाई बुडत चालली आहे. अमली पदार्थ खरोखरच विनाशकारी आहेत. (Aryan khan Drugs arrest)नार्कोटिक्स कंट्रोल ब्यूरो तथा 'एनसीबी'च्या अधिकाऱ्यांना तर या पार्टीत कोण बड्या बापांचे बेटे सामील आहेत, हे ठाऊकही नव्हते. 'फॅशन टीव्ही'चा संचालक काशिफ खानने एक रेव्ह पार्टी क्रूझवर आयोजित केलीय, इतकेच त्यांना कळले होते. तिथे काशिफ खान सापडला नाही पण आर्यन खान हाती लागला आणि हाहाकार माजला. अधिकाऱ्यांकडून या रेव्ह पार्ट्यांविषयी मला मिळालेली माहिती अंगावर शहारे आणणारी आहे. त्यात गांजा, चरस, अफू, कोकेन या अमली पदार्थांबरोबर एमडीएमए नावाच्या एका अमली पदार्थाचाही वापर होतो. हा अमली पदार्थ कामोत्तेजक भावना उत्पन्न करतो ज्यामुळे पुढचे काही तास आणि एकापेक्षा अधिक व्यक्तींशी समागमाची शक्ती टिकून राहते. हे सगळे ज्या मुलींबरोबर होते त्याही कोणा कुटुंबातल्याच मुली असतात. मौजमस्तीच्या नादात त्या स्वत:ला नशेच्या क्रूर पंजात सोपवतात. पण यासाठी फक्त या मुलांनाच दोषी मानायचे का? - माझ्या मते या मुलांचे आईवडील, कुटुंबीय यासाठी जास्त दोषी आहेत. आपला मुलगा, मुलगी काय करतात याकडे लक्ष देणे कुटुंबीयांचे कर्तव्य असते. झगमगाटाच्या दुनियेकडून मध्यमवर्गीय मुलींची शिकार केली जाते, तर श्रीमंतांची मुले केवळ मौजमस्तीसाठी या चक्रात सापडतात. पैसा आहे; याचा अर्थ मुले बिघडली तरी चालेल असा नव्हे! मोलमजुरी करून, भांडी घासून मुलांना शिकवणारे आईबापही असतात. त्यातून एक अब्दुल कलाम पुढे येतो. मुलांना रोजखर्चाला हजारो रुपये देणारे आणि इतके पैसे कशाला हवेत? हेही न विचारणारे आईबापही असतात. रात्री उशिरा घरी आले तरी कुठे होतात, असे ते मुलांना विचारत नाहीत. या बेपर्वाईचा परिणाम दुसरा काय होणार? खिसे गरम असलेल्या मुला-मुलींना आपल्या सापळ्यात ओढण्यासाठी कोपऱ्या कोपऱ्यावर अमली पदार्थांचे दलाल आमिष दाखवत उभे असतात. रेव्ह पार्ट्यांमध्ये यासाठीच तर हॉलिवूड-बॉलिवूडचे तारे किंवा त्यांच्या मुलांना सामील करुन घेतलं जातं. काही वर्षांपूर्वी एका व्हिडिओने मोठी खळबळ उडवली होती; ज्यात फिल्मी दुनियेतील मोठमोठ्या हस्ती होत्या, पण त्यांच्यावर काहीही कारवाई झाली नाही. असं का? मी मुंबईत शिकत होतो तेव्हा पाहायचो, ज्या पानाच्या दुकानात भगवान शंकरांची तसबीर असायची तेथे गांजा, चरस हमखास विकला जात असे. शंकराची तसबीर ही याची खूण; की इथे अमली पदार्थ मिळतील. खुलेआम हा धंदा चालत असे. त्यानंतर नशेत चूर असणाऱ्या हिप्पींचे भारतात आगमन झाले. गोव्याच्या समुद्रकिनाऱ्यावर ते पडून असायचे. तेथे अमली पदार्थांची उलाढाल करणारी संस्कृती निर्माण झाली. त्यात सेक्सही होताच. त्यानंतर पूर्ण देशात अमली पदार्थांचा कारभार सुरू झाला. या कारभाराची आर्थिक व्याप्ती दोन लाख कोटींच्या घरात ती असावी असा अंदाज आहे पण स्थिती त्यापेक्षा गंभीर असावी, असे मला खात्रीने वाटते. जगातले सर्वात मोठे माफिया अमली पदार्थ विक्रेते आहेत. शस्त्रे विकणारे दुसऱ्या नंबरवर असतात. दोघेही एकमेकांशी जुळलेले आहेत आणि त्यांचे लागेबांधे दहशतवादी संघटनांशी जोडलेले आहेत.अमली पदार्थांच्या कारभारात भारत जगातल्या पहिल्या दहा प्रमुख देशात मोडतो. भारतात अमली पदार्थांची मोठी विक्री होते. भौगोलिक स्थितीमुळे भारत हे वितरणासाठी सोयीचे केंद्र ठरते आहे.जगात उत्पन्न होणाऱ्या अमली पदार्थांपैकी ४० टक्के अफगाणिस्तानात तयार होतात. तस्करीच्या मार्गाने ते भारतात आणून येथे प्रक्रिया केली जाते. नंतर हे तयार पदार्थ जगाच्या विविध भागात पाठवले जातात. अमली पदार्थांविरुद्ध आपल्याकडे दुर्दैवाने कायदे कडक नाहीत. सिंगापूरसारख्या देशात अमली पदार्थ बाळगण्याला फाशीची शिक्षा आहे. आपल्याकडे अशी तरतूद झाली पाहिजे. अमली पदार्थांविरुद्ध आपल्याला प्रशासनिक आणि सामाजिक स्तरावरही लढावे लागेल. अमली पदार्थांच्या काळया दुनियेत ढकलले जाण्यापासून आपली मुले वाचवायची तर सजग राहावेच लागेल. एसीबी संचालक समीर वानखेडेंशी एकदा बोलत होतो. मी त्यांना म्हणालो, 'तुम्ही विदर्भाच्या मातीत, शेतकऱ्याच्या पोटी जन्माला आलात. विदर्भाची माती स्वातंत्र्याची माती आहे. तुम्हाला संधी मिळालीय, आईवडिलांचे संस्कार आहेत, आता तुम्ही या अमली पदार्थ बाळगणाऱ्यांना अजिबात सोडू नका'. त्यांनीही मला वचन दिले, 'मी प्रामाणिकपणे यावर आघात करीन'.- ते तसे करत आहेत याचा मला आनंद आहे. राजकारण्यांनी एकजुटीने त्यांच्या मागे उभे राहिले पाहिजे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावरील पारिवारिक संस्कार असे आहेत, की ड्रग्जचा कारभार ते नक्कीच नेस्तनाबूत करतील.जाता जाता : एकदा एका आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या डॉक्टरशी बोलत होतो. शस्त्रक्रिया करण्याच्या आधी ते रुग्णाला विचारतात, तुम्हाला काही व्यसन नाही ना? आश्चर्य म्हणजे ८० टक्के तरुण सांगतात की, ते कोणती ना कोणती नशा करतात. नशा करणाऱ्या या मुलांमध्ये तुमचा मुलगा/ मुलगी तर नाही ना?"

# एक लस लाखमोलाची!

- *करोनावरील लस अत्यल्पावधीत तयार झाली, पण आफ्रिकेस ती मिळण्यास विलंबच होतो आहे. याउलट, मलेरियावरील लस मात्र आफ्रिकेतच सर्वप्रथम दिली जाईल...*
- *या निमित्ताने लसकारणाबद्दल प्रश्न जरूर उभे राहतात. तरीही आफ्रिकेतील बालकांचा जीव वाचू शकतो, हे महत्त्वाचेच...*

करोनामुळे जगभर उडालेला हाहाकार आणि त्याच्या निराकरणासाठी निरनिराळ्या लशींवर सुरू असलेले संशोधन, या लशींची व्यक्त अपरिहार्यता आणि त्या निमित्ताने होत असलेल्या संबंधित कंपन्यांच्या अव्यक्त जाहिराती या गदारोळात एका अत्यंत महत्त्वाच्या रोगावरील पहिल्यावहिल्या लशीच्या निर्मिती व मान्यतेकडे काहीसे दुर्लक्ष झाले. हिवताप किंवा मलेरिया या डास-जन्य रोगाने मानवी इतिहासात कित्येक शतके हैदोस घातला. आजही विशेषत: सहाराच्या दक्षिणेकडील आफ्रिकी देशांमध्ये आणि त्यातही लहान मुलांमध्ये मलेरिया मृत्युदर लक्षणीय आहे. त्याहीपेक्षा चिंतेची बाब म्हणजे, मलेरियाच्या प्रादुर्भावास कारणीभूत ठरणारा सर्वांत घातक परजीवी – प्लास्मोडियम फॅलसिपेरम – वर्षभरात चार-पाच वेळा शरीरातच दडून रक्तपेशींवर प्रहार करू शकतो. त्याने पाच वर्षांखालील मुलांचा मृत्यू ओढवू शकतोच; शिवाय रोगप्रतिकारशक्ती क्षीण होणे, वाढ खुंटणे अशा सहव्याधी उद्भवू शकतात. जागतिक आरोग्य संघटनेच्या एका अहवालानुसार जगभरात आजही मलेरियामुळे दरवर्षी साधारण चार लाख माणसे दगावतात. भारतात मलेरियामुळे दगावणाऱ्यांची संख्या हल्ली बऱ्यापैकी आटोक्यात आली असली तरी हजारो आजही बाधित होतच असतात. मुंबई-पुणे-ठाणे अशा महापालिकांनाही वेळोवेळी मलेरियाच्या प्रादुर्भावाबाबत नागरिकांना सावधानतेचा इशारा द्यावा लागतो. मलेरिया निर्मूलनासाठी औषध फवारणीसारख्या विविध उपायांवर आजही कोट्यवधी रुपये आपल्याकडे खर्च होतात. मलेरियाबळींची संख्या आपल्याकडे बऱ्यापैकी कमी झाली असली (उदा. २०१०मध्ये १०१८ ते २०२०मध्ये ९३) तरी एकेकाळी अपरिमित हानी पोहोचवलेल्या या रोगाची दहशत कमी झालेली नाही. याचे कारण पोलिओ किंवा स्मॉल-पॉक्स ('देवी') या रोगांप्रमाणे मलेरियाचे समूळ उच्चाटन भारतातून झालेले नाही. मलेरिया पसरवणाऱ्या डासांना प्रतिबंध केला जातो म्हणून त्यांचा उच्छाद कमी होतो. परंतु त्याहीपेक्षा जालीम उपाय म्हणजे मलेरियाच्या हल्ल्यासाठी प्रतिकारशक्ती सज्ज ठेवणे अर्थात लसीकरण.



ग्लॅक्सो-स्मिथक्लाइन या ब्रिटिश कंपनीने विकसित केलेल्या मॉस्क्युरिक्स (शास्त्रीय नाव – आरटीएस, एस) या लशीच्या प्रत्यक्ष वापरास जागतिक आरोग्य संघटनेने हिरवा कंदील दाखवला आहे. या लशीच्या चाचण्या केनिया, घाना आणि मालावी या देशांमध्ये घेतल्या गेल्या आणि त्यांतून बऱ्यापैकी सकारात्मक निष्कर्ष निघाले. या लशीची परिणामकारकता ३० टक्के आहे. करोनाप्रतिबंधक बहुतेक लशींची ७० ते ९० टक्के परिणामकारकता पाहता, या लशींच्या तुलनेत मॉस्क्युरिक्स फारच कुचकामी वाटण्याची शक्यता अधिक. मग तिचा इतका गाजावाजा कशासाठी? आणि अशी लस बनण्यासाठी इतकी वर्षे का लागावीत? या प्रश्नांची उत्तरे शोधताना, सध्याच्या करोनाप्रतिबंधक लस विकसन प्रयत्नांबाबतही नव्या जाणिवा तयार होतात.

सुरुवातीला मॉस्क्युरिक्सविषयी थोडे तपशिलाने. जगात शंभरहून अधिक प्रकारचे मलेरिया परजीवी अस्तित्वात आहेत. यापैकी पाचेक अधिक संसर्गजन्य मानले जातात. त्यातही सर्वाधिक घातक परजीवी म्हणजे प्लास्मोडियम फॅलसिपेरम. भारतामध्ये प्लास्मोडियम वायवॅक्स हा परजीवी अधिक प्रभावी ठरतो. मॉस्क्युरिक्स लस मात्र सध्या प्लास्मोडियम फॅलसिपेरमलाच लक्ष्य करणार आहे. या लशीच्या चाचण्या २०१५ मध्येच सुरू झाल्या. यात सरासरी दहापैकी चार मुलांना मलेरियापासून सरसकट संरक्षण मिळाल्याचे आढळले. उर्वरित तीन मुलांचा तीव्र संसर्गापासून बचाव झाला. याशिवाय जवळपास एकतृतीयांश रुग्णांना रक्त संक्रमणाची वेळ आली नाही. पण या निव्वळ चाचण्या होत्या आणि या लशीची परिणामकारकता वास्तव जगतात किती राहील याविषयी साशंकता होती. ही लस चार मात्रांमध्ये द्यावी लागते. अंतिम टप्प्यातील चिकित्सक चाचणीसाठी घाना, केनिया आणि मालावी या आफ्रिकी देशांतील पाच वर्षांखालील आठ लाख बालकांना या लशीच्या चारही मात्रा देण्यात आल्या. पैकी जवळपास दोनतृतीयांश बालकांना मच्छरदाणी आदी डास प्रतिबंधक उपायांचे कवच मिळण्याची कोणतीही सोय नव्हती. चाचणीचे निष्कर्ष तुलनेने आश्वासक वाटल्यामुळे तिला केवळ आफ्रिकी देशांमध्ये आणि तेही केवळ पाच वर्षे व त्याखालील मुलांसाठीच वापरण्याची परवानगी देण्यात आली. जवळपास ३० टक्के परिणामकारकतेचा उल्लेख सुरुवातीला आलाच आहे. तरीही लशीला मान्यता मिळाली याची कारणे अनेक. मलेरियास कारणीभूत ठरणारा परजीवी अत्यंत गुंतागुंतीचा आणि चलाख असतो. हजारो वर्षे उत्क्रांत झाल्यामुळे मानवाच्या रोगप्रतिकारकशक्तीला सहज चकवा देऊ शकतो. सध्या करोना विषाणूची दहशत प्रचंड आहे. परंतु औषधशास्त्र आणि सूक्ष्मजीवशास्त्रातील दाखले द्यायचे झाल्यास, मनुष्य आणि डासांमध्ये वाढणारा प्लास्मोडियम परजीवी अधिक आव्हानात्मक ठरतो. यकृतपेशी आणि लाल रक्तपेशींमध्ये दडून बसण्याची त्याची क्षमता ही वैद्यकशास्त्राच्या दृष्टीने मोठी डोकेदुखी आहे. सध्या विकसित झालेली मॉस्क्युरिक्स लस या परजीवीला यकृतापर्यंत पोहोचू देत नाही. आफ्रिकेसाठी ही लस वरदान ठरते. याचे कारण या रोगाने दरवर्षी जवळपास अडीच लाखांहून अधिक बालके एकट्या आफ्रिकेत दगावतात. मलेरिया बाधितांपैकी दरवर्षी ९४ टक्के एकट्या आफ्रिकेत आढळतात. त्यामुळे ही लस या उपेक्षित खंडासाठी संजीवनी ठरेल, कारण ती अत्यंत वाजवी दरात उपलब्ध होत आहे.

या निमित्ताने करोना लशीबाबत आफ्रिका खंडाची जी उपेक्षा सुरू आहे, ती ठळकपणे जाणवण्यासारखी आहे. मलेरिया लशीवरील अनेक प्रयोग मध्यंतरीच्या वर्षांत थंडावले, कारण प्रगत आणि नवप्रगत देशांतून मलेरियाचे उच्चाटन जवळपास पूर्ण झाले होते. पण हे उच्चाटन जागतिक नव्हते आणि मनुष्यजातीतील एक मोठा वर्ग या रोगाविरुद्ध असहाय होता याकडे त्या वेळीही फार कोणी लक्ष पुरवले नाही. मुळात हा रोग अत्यल्प वा अल्प उत्पन्न देशांमध्ये अधिक प्रभावी असल्यामुळे, लसनिर्मितीतून जो मलिदा औषधनिर्माण कंपन्यांना अपेक्षित असतो, तो अशा प्रकल्पांतून नगण्य प्रमाणात उपलब्ध होतो. एचआयव्ही विषाणूचा उद्भव आफ्रिकेतला. पण गतशतकाच्या उत्तरार्धात या विषाणूमुळे होणाऱ्या एड्स विकाराने सर्वाधिक थैमान घातले अमेरिकेसारख्या श्रीमंत देशात. त्यामुळे एड्सप्रतिबंधक लशीची अवाढव्य बाजारपेठच जन्माला आली. यातूनही परिणामकारक लस आजतागायत हाती आलेली नाही हा भाग वेगळा. 'कॉमन फ्लू' किंवा ज्वर प्रतिबंधक हजारो लशी जगभर तयार होतात आणि प्रगत देशांमध्ये खोऱ्याने विकल्या जातात. अविकसित किंवा अर्धविकसित देशांमध्ये ज्वरमृत्यू एकतर फार संभवत नाहीत किंवा त्यांच्याकडे तितकेसे लक्ष दिले जात नाही. पण एड्स, फ्लू, आता करोना यांनी श्रीमंत देशांमध्ये हलकल्लोळ उडवल्यामुळे त्यांच्याशी संबंधित लशींना प्राधान्य. कारण नफ्याचे गणित साधता येते. मलेरियाने वर्षानुवर्षे थैमान घातले, पण तो बहुतांशी 'आफ्रिकी' रोग बनून राहिल्यामुळे लसनिर्मितीही संथ. मुळातच लसनिर्मिती ही अतिशय किचकट आणि गुंतागुंतीची प्रक्रिया. त्यात प्रचंड खर्च येतो, त्यामुळे त्याची भरपाई मिळणे निकडीचे बनते. 'बीबीसी'सारख्या संकेतस्थळावर या लसनिर्मितीमुळे उल्हसित झालेल्या आफ्रिकी सर्वसामान्यांच्या आणि प्रतिष्ठितांच्या नुसत्या प्रतिक्रियांवर नजर टाकल्यास, त्यांच्यासाठी या लशीचे मोल सहज लक्षात येते. आफ्रिकेतील अनेक देशांच्या पिढ्या आता उभ्या राहतील आणि देशालाही उभे करतील, अशी अनेकांची समान भावना. मलेरिया प्रतिबंधक लस कशी लाखमोलाची आहे, आणि लशींच्या लाभापासून लाखो अजूनही कसे वंचित राहतात नि ठेवले जातात, हेच यानिमित्ताने अधोरेखित होते.

# कोरोना काळात कर्तव्यदक्ष राहून उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल मा.राज्यपाल यांच्या हस्ते मिरा भाईंदर महानगरपालिका आयुक्त दिलीप ढोले यांना महाराष्ट्राचा कोविड योद्धा म्हणून रोख रक्कम रु 50,000 व सन्मानचिन्ह देऊन केले सन्मानित

## प्राप्त रक्कम मिरा भाईंदर क्षेत्रातील कोविडमूळे निराधार झालेल्या मुलांच्या शिक्षणासाठी वापरण्याचा मा.आयुक्त यांचा निर्णय

दिनांक ३ मार्च २०२१ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका आयुक्त पदी श्री. दिलीप ढोले यांची नेमणूक झाली. तदनंतर माहे एप्रिल महिन्यात संपूर्ण देशात तसेच राज्यभरात कोरोनाच्या दुसऱ्या लाटेला सुरुवात झाली होती.

कोरोनाच्या या दुसऱ्या लाटेचा जास्त प्रमाणात प्रसार होऊ नये याकरिता आयुक्त यांच्यामार्फत दिवस-रात्र त्रिसूत्री म्हणजेच कंट्रोल, कॅपॅसिटी आणि केअर या बाबींवर प्रामुख्याने लक्ष देऊन काम करण्यात आले.

मिरा भाईंदर शहरात कोराना आटोक्यात रहावा करिता स्थानिक प्रशासन व शासन यांचे मध्ये समन्वय राखण्यात आला.

महानगरपालिका अधिकारी, सत्ताधारी तसेच विरोधी पक्ष यांचेबरोबर बैठक घेवून सामूहिक निर्णय घेतले. प्रभाग स्तरावर प्रभाग अधिकारी यांना प्रभाग समित्यांच्या सदस्यांची प्रत्येक महिन्यात विशेष बैठक घेण्यात आली. त्याचबरोबर प्रतिदिन सायंकाळी ५.३० वाजता सर्व प्रभाग अधिकारी व वैद्यकीय अधिकारी यांची व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे बैठक घेण्यात येत होती. प्रत्येक प्रभाग स्तरावर कोरोना दक्षता समितीची स्थापना करण्यात आली. गर्दी नियंत्रण होण्याकरिता नागरीकांना अत्यावश्यक बाबीच्या खरेदी करिता रस्त्यावर न येता नागरीकांना घर बसल्या सेवा/सुविधा देण्यासाठी ॲप तयार केले. व्यापारी संघटना व इतर विक्रेता संघटना यांचे प्रतिनिधीसोबत बैठका घेवून कोरोना नियमांचे पालन करुन नागरीकांसाठी त्यांच्या संकुलात माल विक्री करण्यास परवानग्या दिल्या. त्यामुळे रस्त्यावरील नाहक वाढणारी गर्दी कमी झाली.

कोरोना काळात नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर महानगरपालिका व स्थानिक पोलीस प्रशासन यांचा समन्वय साधून नागरीकांकडून दंड रुपाने रु. ८६,१६,९०२/- इतका दंड वसुल करण्यात आला.

कोरोना रोगीचे प्राथमिक स्तरावर निदान होणे करिता गर्दीच्या ठिकाणी तसेच सर्व विक्रेते, सोसायटीच्या ठिकाणी विशेष कोरोना तपासणीच कॅम्पचे आयोजन करून पुर्वी जेथे १०००-१२०० होणारी RT-PCR टेस्टिंग प्रतिदिन ४५००-५००० इतकी पोहचली. आयुक्त दिलीप ढोले





यांनी महानगरपालिका RTPCR लॅब मधील RTPCR निदान करण्याच्या मशिनची संख्या वाढविल्याने कोरोना चाचणी केल्याच्या दुसऱ्या दिवशीच त्याचा अहवाल नागरिकांना प्राप्त होऊ लागला. शहरात कोरोनाच्या दुसऱ्या लाटेमध्ये महत्वाची बाब म्हणजे महापालिकेने पालिकेचे हॉल/समाज मंदिर मध्ये ICU बेडची तयारी केली. खाजगी रुग्णालयांशी समन्वय साधून त्यांना कोरोना रुग्णालयाचा परवाना देवून ICU बेड्सची संख्या वाढविण्यास सहकार्य केले.

आयुक्त यांनी पदभार स्विकारल्यानंतर ICU व O2 बेड्सची संख्या २५० नी वाढविण्यात आली.

शासनस्तरावर सतत पाठपुरावा करुन शहरात ऑक्सीजनचा पुरेसा साठा उपलब्ध राहील याची दक्षता आयुक्त यांनी वेळोवेळी घेतली. प्रसंगी ऑक्सीजन टँकर वेळेत पोचावे करिता पोलीस प्रशासनाशी समन्वय साधून विशेष कॉरिडोर तयार केले. शहरात ऑक्सीजनचा तुटवडा पडून कोणताही अनर्थ घडला नाही. काही प्रंसगी जेथे खाजगी रुग्णालयात ऑक्सीजन सिलेंडरचा तुटवडा पडत होता, त्या ठिकाणी महानगरपालिकेकडे उपलब्ध असलेले सिलेंडर तातडीची बाब म्हणून त्यांना उपलब्ध करुन दिले. महाराष्ट्र शासन निर्देशानुसार ३ पट साठा क्षमता म्हणजेच ११३.७९ MT उपलब्ध असणे गरजेचे आहे. त्या अनुषंगाने आयुक्त यांनी वारंवार बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार सद्यस्थितीत १५५.६२ MT इतका साठा क्षमता उपलब्ध करण्यात आलेला आहे, म्हणजेच ४१.८३ MT इतका जादा क्षमता मिरा भाईंदर महानगरपालिकेकडे उपलब्ध आहे. कोरोनाची लक्षणे नसलेले परंतु कोरोना निदान झालेल्या रुग्णांना शासन निर्णयानुसार त्यांची घरी उपचार घेण्यात महानगरपालकेतर्फे परवानगी देण्यात आली. अशा रुग्णांना वैदयकिय अधिकाऱ्यामार्फत कोरोना किट देण्यात आले तसेच त्याची नियमित माहिती घेण्यासाठी रुग्णांच्या घरी कोव्हीड कॉल सेंटर मार्फत दररोज फोन करुन संपर्क करण्यात येत होता. कोरोना उपचार घेवून बरे झालेल्या रुग्णांची देखिल प्रकृतीची विचारणा करण्यासाठी कॉल सेंटरद्वारे संपर्क करण्यात आले. कोरोना उपचार घेणाऱ्या रुग्णांना वेळेत व पौष्टीक आहार उपलब्ध करुन दिला. तसेच रुग्णांच्या मनातून कोरोनाची भीती घालवण्याकरीता व रुग्णांचे मन प्रफुल्लित राहावे याकरिता आयुक्त यांनी एक उत्तम उपक्रम राबवत कोरोना रुग्णालयात तसेच कोव्हिड केअर सेंटर या ठिकाणी सकाळ-संध्याकाळ सुगम संगीत, भजन ऐकण्याची सुविधा उपलब्ध करुन दिली.

कोरोना सोबतच शहराचा विकास हे देखिल आयुक्त यांचे प्रमुख उद्दिष्ट होते. शहराची धरोहर जपण्यासाठी सांस्कृतिक वास्तू, कला दालन याची उभारणी, सीसी रस्ते व इतर प्रलंबित राहीलेली विकास कामांना चालना दिली. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी घनकचरा प्रकल्प, सेवरेज ट्रिटमेंट प्लांटचे काम पुर्ण क्षमतेने सुरु करण्यात आले.

कोरोनाचा प्रादुर्भाव शहरात वाढू न देणे तसेच शहराचा विकास होणे या दोन्ही बाबी एकाच वेळी सुरु राहतील याकरिता आयुक्त यांनी आवश्यक ते प्रयत्न करीत नागरीकांमध्ये जनजागृती व्हावी, त्यांच्या समस्या जाणून घेणे व कर्मचाऱ्यांमध्ये कर्तव्य तत्परता जागृत राहावी, याकरीता Walk with Commissioner ही संकल्पना राबविण्यास सुरुवात केली.

शहरातील अनधिकृत बांधकामावर आयुक्त यांचे मार्गदर्शनानुसार मोठ्या प्रमाणावर कारवाई करण्यात आली.

सद्यस्थिती मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सक्रिय कोरोना रुग्णांची संख्या ही २०० इतकी असून रिकव्हरी रेट ९७.०८% इतका आहे. तसेच लसीच्या उपलब्धतेनुसार जास्तीत जास्त नागरिकांचे लसीकरण करण्याकडे मिरा भाईंदर महानगरपालिका आयुक्त यांच्या निर्देशानुसार दैनंदिन नियोजन केले जात असून दुस-या लसीचा कालावधी आलेल्या नागरिकांचे दोन्ही डोस पूर्ण होण्याकडे विशेष लक्ष दिले जात आहे.

त्याचबरोबर मोठ्या प्रमाणावर लस उपलब्ध झाल्यानंतर लसीकरण केंद्रांमध्ये वाढ करून जास्तीत जास्त नागरिकांना लसीकरणाव्दारे संरक्षित करण्याकडे विशेष लक्ष दिले जात आहे. सद्यस्थितीत एकूण ७२% नागरिकांनी लसीचा पहिला डोस व ६६% नागरिकांना लसीचे दोन्ही डोस देऊन संरक्षित करण्यात आले.

कोरोना काळात कर्तव्यदक्ष राहून कोरोनावर नियंत्रण, ICU व O2 ची क्षमता वाढविणे, रुग्णांच्या उपचारात कोणतीही कमतरता न राखणे, शहराचा विकास होण्याकरीता वेगवेगळया नियोजनाची अंबलबजावणी करणे.

या सर्व प्रकारच्या केलेल्या उल्लेखनीय कामगिरीमुळे माननीय महासभेत माननीय आयुक्त यांना सन्मानित करण्यात आले.

उल्लेखनीय कामगिरीमुळे दिनांक ८ ऑक्टोबर २०२१ रोजी मा. महामहीम राज्यपाल श्री. भगत सिंहजी कोश्यारी यांच्या हस्ते मिरा भाईंदर महानगरपालिका आयुक्त श्री. दिलीप ढोले यांचा सन्मान करण्यात आला.

सदर प्राप्त रक्कम मिरा भाईंदर क्षेत्रातील कोविडमूळे निराधार झालेल्या मुलांच्या शिक्षणासाठी वापरण्याचा मा. आयुक्त यांनी निर्णय घेतलेला आहे.

पोलीस बातमी पत्र
संमिश्र
मुंबई, मंगळवार १२ ते १८ ऑक्टोबर २०२१


# ठाणे ग्रामीण जिल्ह्यामध्ये 24 ऑक्टोंबर पर्यंत मनाई आदेश लागू



ठाणे दि. ११/१०/२०२१:- पोलीस अधिक्षक ठाणे (ग्रामीण) यांचे कार्यकक्षेतील सर्व पोलीस स्टेशनच्या हद्दीत दि.०९/१०/२०२१ रोजीचे १२ .०० वाजल्या पासुन ते दि. २४/१०/२०२१ रोजीचे १२ .००वाजेपर्यंत (दोन्ही दिवस धरुन) जिल्हाधिकारी ठाणे राजेश नार्वेकर यांनी खालील बाबीसाठी मनाई आदेश जारी केले आहे. शस्त्रे, तलवारी, भाले, दंडे, सोटे, बंदूका, सुरे, लाठया अथवा काठया अथवा शारीरीक इजा करण्यासाठी वापरता येईल अशी इतर कोणतीही वस्तू बाळगणे. कोणताही क्षारक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ बरोबर नेणे. दगड किंवा क्षेपणास्त्रे किंवा सोडावयाची किंवा फेकावयची उपकरणे किंवा साधने बाळगणे, जमा करणे किंवा लोकांत प्रचार करणे. व्यक्तीचे प्रेत किंवा आकृती किंवा प्रतिमा यांचे प्रदर्शन करणे. सार्वजनिक रितीने घोषणा देणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे. यामुळे सभ्यता अगर नीती यास धक्का पोहोचेल अशा किंवा सुरक्षितता धोक्यात येईल अशा प्रकारची भाषणे तत्वे, हावभाव करणे, सॉग आणणे किंवा चित्रे, चिन्हे, फलक किंवा कोणतीही जिन्नस किंवा वस्तू तयार करणे किंवा लोकांत प्रचार करणे. पाच किंवा पाच पेक्षा जास्त लोकांना एकत्र येण्यास बंदी. सदरचा आदेश प्रेतयात्रा, लग्नाची मिरवणूक तसेच सक्षम प्राधिकाऱ्यांच्या लेखी परवानग्या घेवून काढलेल्या मिरवणूकीस लागू असणार नाही. तसेच सदरचा आदेश केंद्र व राज्य सरकारच्या नोकरीत असलेल्या व त्यांचे वरिष्ठांचे आदेशानुसार अगर कर्तव्याच्या किंवा अपंगत्वामुळे लाठी, काठी बाळगणे आवश्यक आहे अशांना लागू असणार नाही.

# टीव्ही बघणाऱ्या बायकोचा डोक्यात मुसळ घालून खून; नाशिकमधल्या घटनेत आरोपीला जन्मठेप


नाशिकः टीव्ही बघणाऱ्या बायकोच्या डोक्यात स्वयंपाकघरातील लोखंडी मुसळ घालून खून करणाऱ्या आरोपीला जिल्हा व सत्र न्यायालयाने आज सोमवारी (10 ऑक्टोबर) जन्मठेपेची शिक्षा ठोठावली. आण्णासाहेब निवृत्ती गायके (वय 55) असे आरोपीचे नाव आहे.

याप्रकरणाची सविस्तर माहिती अशी की, आण्णासाहेब गायके हा पत्नी ज्योती गायके (वय 50) यांच्यासोबत नाशिकरोडवरील शिवराम नगरमध्ये रहायचा. त्यांना अजिंक्य गायके (वय 32) हा मुलगा आहे. आरोपी आण्णासाहेब हा पत्नी ज्योतीच्या चारित्र्यावर सतत संशय घ्यायचा. त्यामुळे दोघांमध्ये नेहमी कडाक्याचे भांडण व्हायचे. 10 जानेवारी 2018 रोजी सायंकाळी साडेसात वाजता ज्योती या घरातील हॉलमध्ये टीव्ही बघत बसल्या होत्या. यावेळी पुन्हा एकदा आण्णासाहेब याने त्यांच्या चारित्र्यावर संशय घेतला. यावरून दोघांमध्ये वाद सुरू झाला. शब्दाला शब्द वाढत जाऊन वाद विकोपाला गेला. त्यात आण्णासाहेब याने स्वयंपाक घरातील लोखंडी मुसळ आणून पत्नी ज्योतीच्या डोक्यात घातले. हे भांडण सोडवण्यासाठी मुलगा अजिंक्य आणि आण्णासाहेबची बहीण यांनी




मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्याने या दोघांनाही ठार मारण्याचा प्रयत्न केला. याप्रकरणी उपनगर पोलीस ठाण्यात कलम 302, 307 नुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. अन्यथा सहा वर्षांचा कारावासही… या गुन्ह्याचा तपास पोलीस निरीक्षक महेंद्र चव्हाण यांनी केला. त्यांनी आरोपीविरुद्ध सबळ पुरावे गोळा करून जिल्हा व सत्र न्यायालय नाशिक येथे दोषारोपपत्र दाखल केले. यावर आज सोमवारी (11 ऑक्टोबर) न्यायमूर्ती व्ही. एस. कुलकर्णी यांनी परिस्थितीजन्य पुराव्याच्या आधारे आरोपीस कलम 302 नुसार जन्मठेप आणि दहा हजारांच्या दंडाची शिक्षा ठोठावली. दंड न भरल्यास सहा वर्षांच्या कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली. पोलीस आयुक्तांकडून कौतुक खटल्यात सरकारी पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता म्हणून सुलभा सांगळे यांनी काम पाहिले. पैरवी अधिकारी म्हणून पोलीस हवालदार के. के. गायकवाड, पोलीस कॉन्स्टेबल आर. आर. जाधव, पोलीस हवालदार आर. एन. देशमुख यांनी काम पाहिले. याप्रकरणी तपासी अंमलदार आणि पैरवी अधिकाऱ्यांनी गुन्हा सिद्ध होण्यासाठी केलेल्या कामगिरीचे पोलीस आयुक्त, पोलीस उपायुक्त यांनी कौतुक करत त्यांचे अभिनंदन केले आहे.

# महाराष्ट्रात मराठी माणसावर अन्याय - भाईंदरमध्ये मराठी माणसाला घर नाकारणाऱ्यावर गुन्हा दाखल




दिनांक १०/१०/२०२१ : मराठी एकीकरण समितीकडून मराठी माणसाला घर विकण्यास नकार दिल्याबद्दल घरमालकावर नयानगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सोशल मीडियावर रिंकू संगोई देढीया यांची घर विक्रीसंबंधातील एक पोस्ट मराठी एकीकरण समितीचे अध्यक्ष गोवर्धन देशमुख यांनी वाचली. यात मिरा रोड येथील एका फ्लॅट विक्रीसंदर्भात लिहिण्यात आले होते.परंतु हा फ्लॅट केवळ गुजराती, जैन आणि मारवाडी या समाजातील व्यक्तींनाच विकायचा आहे असे सांगण्यात आले . देशमुख यांनी संबंधीतांशी संपर्क साधला असता या सोसायटीत मराठी, मुस्लिम, ख्रिश्चन आदी लोकांना फ्लॅट विकत नाहीत. तसा सोसायटीचा नियम आहे व त्यामुळे तुम्हांला हा फ्लॅट विकता येणार नाही असे सांगण्यात आले. हा असा वेगळाच नियम ऐकून गोवर्धन देशमुख यांनी आपले सहकारी प्रदीप सामंत आणि सचिन घरत यांच्यासह नयानगर पोलिस ठाण्यात जावून तक्रारीवरून नयानगर पोलिस ठाण्यात राहुल देढीया आणि रिंकू संगोई देढीया यांच्याविरोधात जातीय तेढ निर्माण केल्याबद्दल गुन्हा दाखल केला आहे

# नगर पोलीस ठाण्याची धडाकेबाज कामगिरी- आरोपीस 48 तासांत केली अटक.




दिनांक : ०७/१०/२०२१ : तक्रारदार या आपल्या पती व त्यांचा मानलेला मुलगा अशिष जानवेद यादव वय-२३ यांच्या बरोबर दिनांक:०६/१०/२०२१ रोजी रात्रौ ०९.४५ वा.चे सुमारास असतांना आशिष व आपल्या पत्नीचे अनैतिक संबंध असल्याचा त्यास संशय येत होता तोच राग मनात धरून आरोपी ने अशिष यादव याच्यावर जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने धारदार चाकुने मानेवर गंभीर जखमी केले. यावरून त्यांनी दिनांक : ०७/१०/२०२१ रोजी विष्णू नगर पोलीस ठाणे येथे तक्रार नोंदवली त्यावरून आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला . सदरचा गुन्हा गंभीर असल्याने व आरोपी यांच्या पत्नीला हि जिवाला धोका असल्याने गुन्हयातील आरोपीचा शोध घेऊन तात्काळ ताब्यात घेणे आवश्यक असल्यामुळे मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. पंढरीनाथ भालेराव यांनी त्यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण अधिकारी श्री. गणेश वडणे, सहा. पोलीस निरीक्षक, पो.हवा.पाटणकर, पो.कॉ.क. भामरे व पो.कॉ.मिळास यांचे पथक नेमले. आरोपीने आपला मोबाईल बंद केल्यापासुन त्याचे लोकेशन मिळण्यास पोलिसांना अडचण निर्माण होत होती. तसेच त्याने मोबाईल बंद केल्यानंतर शेवटच्या लोकेशनच्या आधारे त्याचा माग घेत असताना त्याच्या मुळ गावी रत्नागीरी येथे पथक जात असताना त्याने अचानक नवीन सिम कार्ड टाकुन मोबाईल चालू केला व एक कॉल करुन पुन्हा मोबाईल बंद केला त्यामुळे तपासाची दिशा बदलली. त्याचा ठावठिकाणा गुजरात राज्याच्या सिमेलगत, पालघर जिल्हयात डहाणु, घोलवड येथे गावच्या आजुबाजूला असल्याचा पोलीस पथकास संशय असल्याने सदर पथक हे माणगाव, रायगड येथून परत पालघर येथे जावून गुजरात सिमेजवळून आरोपीस ताब्यात घेतले. त्यास पोलीस ठाणे येथे आणुन तपासी अधिकारी श्री. राहुन खिलारे, पोलीस निरीक्षक ( गुन्हे ) याचे ताब्यात देण्यात आला. सदर गुन्हयाचा प्राथमिक तपास हा महिला पोलीस उपनिरीक्षक कपिले यांनी केला आहे.

सदरची कारवाई हि श्री. सचिन गुंजाळ सो, पोलीस उप आयुक्त परिमंडळ ३ कल्याण, मा. सहा पोलीस आयुक्त श्री. जयराम मोरे सो डोंबिवली विभाग व मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री पंढरीनाथ भालेराव यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीरण अधिकारी स.पो.नि.श्री गणेश वडणे पोहवा.पाटणकर, पोशि. भामरे, पोशि. मिसाळ यांनी तसेच दुसरे पथकातील पो.ना. सांगळे, पो.ना. लोखंडे, पो. ना.क.कांगुणे यांनी सदरची करवाई यशस्वी पणे पार पाडली आहे. नमुद गुन्हयाचा पुढिल तपास पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. राहुल खिलारे हे करत आहेत.

# अश्लील हावभाव, बिभत्स नृत्य, उल्हासनगरमध्ये डान्स बारवर कारवाई, 17 बारबाला ताब्यात




उल्हासनगर : ठाणे जिल्ह्यातील उल्हासनगर शहरामध्ये डान्स बारवर कारवाई करत गुन्हे शाखेनं बारबालांसह वेटर आणि ग्राहकांना ताब्यात घेतलं. चांदनी नावाच्या बारवर ही कारवाई करण्यात आली. 17 बारबालांसह वेटर आणि ग्राहक अशा 40 जणांना पोलिसांनी ताब्यात घेतलं. काय आहे प्रकरण? उल्हासनगरच्या 17 सेक्शन चौकाजवळ चांदनी नावाचा बार आहे. या बारमध्ये बारबाला बिभत्स नृत्य करत असल्याची माहिती उल्हासनगर गुन्हे शाखेला मिळाली होती. त्यानुसार गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेश तरडे यांनी स्वतः पथकासह शनिवारी रात्री उशिरा या बारवर धाड टाकली. बारबाला, वेटर, ग्राहकांवर कारवाई यावेळी बारमध्ये 17 बारबाला अश्लील हावभाव करत नृत्य करत असल्याचं समोर आल्यानं या बारवर कारवाई करण्यात आली. यावेळी 17 बारबाला, 13 वेटर्स आणि 10 ग्राहकांना गुन्हे शाखेनं ताब्यात घेतलं.

उल्हासनगर शहरात अनेक डान्सबार असून एक दिवस कारवाई झाली की पुन्हा दुसऱ्या दिवशीपासून हे बार सुरू होतात. त्यामुळे बारवर कडक कारवाई करण्याची गरज निर्माण झाली आहे. गोरेगावमधील डान्स बारवर छापा याआधी, लॉकडाऊनमध्ये सुरु असलेल्या डान्स बारवर मुंबई पोलिसांनी गेल्या वर्षी ऑक्टोबर महिन्यात धाड टाकली होती. यावेळी पोलिसांनी 15 ग्राहकांसह 20 जणांना अटक करण्यात आली होती. गोरेगाव पोलिसांनी ही धडक कारवाई केली होती. पोलिसांनी या बारमधील तळ घरातून 11 मुलींची सुटका केली होती. पोलिसांनी गोरेगाव येथील एका डान्स बारवर कारवाई केल्यानंतर परिसरात एकच खळबळ उडाली होती.

# नवी मुंबईत चक्क फूटपाथ 10 फूट खाली कोसळला, नाल्यात पडून तरुण जखमी



नवी मुंबई : नवी मुंबईत फूटपाथ कोसळल्यामुळे तरुण जखमी झाल्याची माहिती आहे. तरुणासह दोन स्कूटी नाल्यात पडल्या. ही घटना सीसीटीव्ही कॅमेरामध्ये कैद झाली असून त्याचा व्हिडीओ समोर आला आहे. नेमकं काय घडलं? वाशी सेक्टर 19 येथील 20 मीटर लांब फुटपाथ तब्बल 10 फूट खाली कोसळल्याने एक मोठा अपघात झालाय. रात्री अचानकपणे इतका मोठा फुटपाथ कोसळला. या फुटपाथवरून चालत असलेला एक तरुण आणि फुटपाथवर असलेल्या 2 स्कुटी नाल्यात पडल्या. तरुण जखमी, स्कूटीचेही नुकसान यामध्ये तरुण जखमी झाला असून त्याच्यावर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. तर 2 स्कुटीचे देखील मोठे नुकसान झालेय. इतका मोठा फुटपाथ क्षणात कोसळल्याने या फुटपाथच्या बांधकाम निकृष्ट दर्जाचे दिसून येत आहे. फूटपाथचे बांधकाम निकृष्ट असल्याचा दावा अतिशय निकृष्ट दर्जाचे कामकाज झाले असल्यानेच ही दुर्घटना घडली असून स्थानिक नागरिकांकडून महापालिका प्रशासनाविरोधात रोष व्यक्त करण्यात येत आहे.

# खेळता-खेळताच ग्राऊंडवर कोसळला, चक्कर येऊन अवघ्या 15 वर्षांच्या क्रिकेटपटूचा नाशिकमध्ये मृत्यू



नाशिकः क्रिकेट खेळताना चक्कर येऊन अवघ्या 15 वर्षांच्या मुलाचा मृत्यू झाल्याची घटना नाशिकमधल्या सिडको भागात घडली आहे. श्रेयस सुधीर ढोरे, असे मृत मुलाचे नाव आहे. ही घटना सीसीटीव्हीत कैद झाली आहे.नाशिकमधल्या सिडकोतल्या रणभूमी मैदानावर श्रेयस आणि त्याच्या मित्रांचा रोज क्रिकेटचा डाव रंगायचा. रविवारीही त्यांचा क्रिकेटचा डाव रंगला. मात्र, श्रेयसला अस्वस्थता जाणवू लागली. त्याकडे त्याने दुर्लक्ष केले. काही वेळानंतर त्याला अचानक चक्कर आली. तो खाली बसला. मुलांना वाटले दमला असेल. त्यामुळे त्यांनी त्याच्याभोवती कोंडाळे केले. काही वेळातच त्याची तब्येत खालावली. तो बेशुद्ध पडला. मुलांनी त्याला उठवण्याचा प्रयत्न केला. कोणी त्याच्या तोंडात फुंकले, तर कोणी वारा घालण्याचा प्रयत्न केला. पण श्रेयसने प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे घाबरलेल्या श्रेयसच्या मित्रांनी त्याला उचलून वाहनापर्यंत नेले आणि थेट जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले. श्रेयसची तब्येत बिघडल्याची माहिती त्याच्या घरी देण्यात आली. श्रेयसचे वडील, आई आणि नातेवाईकांनी शासकीय रुग्णालय गाठले. मात्र, डॉक्टरांनी त्याला तपासले आणि त्याचा मृत्यू झाल्याचे जाहीर केले. अवघ्या पंधरा वर्षांच्या तरुण क्रिकेटपटूचा असा करुण अंत व्हावा, याबद्दल हळहळ व्यक्त होत आहे. श्रेयसच्या अचानक झालेल्या मृत्यूचा त्याच्या मित्रमंडळींना चांगलाच धक्का बसला आहे. या प्रकरणी पोलिस ठाण्यात नोंद करण्यात आली असून, पोलिसांनी पुढील तपास सुरू केला आहे. श्रेयसचा मृत्यू मानसिक ताणामुळे झालेला असू शकतो, अशी शक्यता वर्तवण्यात येत आहे. मात्र, हा ताण नेमका कशाचा, याबद्दल तर्कवितर्क लढविण्यात येत आहेत.

# भिवंडी गुन्हे शाखेकडुन महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत केलेला हुक्क्याचा निकोटीनयुक्त

## अफजल' व 'सोएक्स हर्बल' असा रु. 9,36, 78,520/- चा हुक्का फ्लेवरचा साठा जप्त

ठाणे, दिनांक 06 ऑक्टोंबर 2021 रोजी भिवंडी, युनिट-2, गुन्हे शाखेच्या पथकाने धामनकरनाका भिवंडी येथील 'अल्ताफ अत्तरवाला' या दुकानावर गोपनीय माहितीच्या आधारे छापा टाकुन महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेल्या हुक्क्याचे वेगवेगळ्या प्रकारचे 57 हुक्का फ्लेवरचा माल किं. रु 8940/- चा जप्त करुन नारपोली पोलीस ठाणे गु.र.नं.622/ 2021 भादंवि कलम 188 सह, सिगारेट व इतर तंबाखु उत्पादने (जाहीरातीस प्रतिबंध आणि व्यापार व वाणिज्य व्यवहार आणि उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे विनीयमन) अधिनियम 2003 चेकलम 4(अ) 21 (अ), 7, 20(2), 13(क) अन्वये दि. 06 ऑक्टोबर 2021 रोजी गुन्हा दाखल केला होता. सदर गुन्ह्याचा पुढील तपास





वरिष्ठांच्या आदेशाने गुन्हे शाखा, युनिट-2, भिवंडी यांच्याकडुन करण्यात येत आहे. वरील गुन्ह्याच्या तपासादरम्यान तसेच वरिष्ठांनी दिलेल्या सुचनेनुसार भिवंडी शहर परिसरामध्ये महाराष्ट्र राज्यामध्ये प्रतिबंधीत असलेल्या हुक्क्याच्या साठ्याचा शोध घेत असतांना गोपनीय माहितीद्वारे दिनांक 08 ऑक्टोबर 2021 ते दि. 09 ऑक्टोबर 2021 रोजी दापोडा गाव हद्दीतील हरीहर कॉम्प्लेक्स, कृष्णा कन्स्ट्रक्शन बिल्डींग नं एफ/5, या गोडावुनच्या गाळा नं 4, 5, 6 येथे असलेल्या M/s HIGH STREET IMPEX LLP, MUMBAI या कंपनीच्या गोडावुनवर छापा कारवाई केली असता, सदर कंपनीच्या गोडावुनमध्ये महाराष्ट्र राज्यामध्ये प्रतिबंधीत असलेला निकोटीनयुक्त 'अफजल हुक्का फ्लेवर' एकुण बॉक्स 2862, किं. रु 8,42,49,610/- आणि 'सोएक्स हर्बल फ्लेवर' चे 375 बॉक्स किं. रु.94,28,910/- असा एकुण 9,36,78,520/- रु. किं. चा हुक्का फ्लेवरचा माल मिळुन आलेला असुन तो जप्त करण्यात आला आहे. सदरचा 'अफजल हुक्का फ्लेवर' आणि 'सोएक्स हर्बल हुक्का फ्लेवर' हे दोन्ही हुक्का फ्लेवरचा माल 'सोएक्स इंडीया प्रा. लि', निर्मल, 21 वा माळा, नरीमन पॉईंट, मुंबई या कंपनीकडुन उत्पादन व निर्यात केला जात असून सदर उत्पादन केलेला हुक्का फ्लेवरचा माल सदर गोडावुनमधुन बेकायदेशिरपणे विक्री केला जात आहे. सदर सोएक्स इंडीया प्रा. लि. या कंपनीकडुन बनविलेला निकोटीनयुक्त 'अफजल हुक्का फ्लेवर' हा माल भिवंडी शहर परिसरात, ठाणे शहर परिसरात मुंबई शहर त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्यामध्ये इतर ठिकाणी मोठ्या प्रमाणामध्ये विक्री होत असल्याचे प्राथमिक तपासामध्ये निष्पन्न झालेले आहे. आजची बहुसंख्य तरुण पिढी अंमली पदार्थ, हुक्क्याचे सेवन तसेच इतर व्यसनांच्या आहारी जावुन विळख्यात सापडलेली आहे. त्यामुळे किशोरवयीन मुले / मुली, तरुण / तरुणी हे हुक्का सेवनाकडे मोठ्या प्रमाणात आकर्षित होऊन सेवन करीत आहेत. हुक्क्याच्या सेवनामुळे त्यांचे आरोग्यावर घातक परिणाम होऊन काही मुले, तरुण हे गुन्हेगारी प्रवृत्तीकडे वळलेले दिसनु येत आहेत. वरीलप्रमाणे जप्त केलेल्या हुक्क्याचा मालाबाबत सखोल तपास करण्यात येत असुन बेकायदेशीर साठा केलेल्या कंपनीविरुध्द पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येत असून पुढील तपास गुन्हे शाखा, भिवंडी युनिट-2 हे करीत आहेत. वरील कामगिरी वरिष्ठांच्या सुचना व मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, युनिट-2 चे वपोनि अशोक होनमाने, सपोनि महेंद्र जाधव, पोउपनि शरद बरकडे पोहवा अनिल पाटील, पोहवा सुधाकर चौधरी, पोहवा राजेंद्र चौधरी, पोहवा देवानंद पाटील, पोना श्रीधर हुडेकरी, पोना रंगनाथ पाटील, पोना प्रमोद धाडवे, पोना सचिन जाधव, पोना सावीर शेख, पोना किशोर चोरात, पोशि वसंत गवारे, पोशि सचिन सोनावणे, पोशि भावेश घरत यांनी केली आहे.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव ( पूर्व ), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर ( पूर्व ), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. ( सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत ).संपर्कः-9594418181 / 8424989898